“हैद्राबाद मुक्तीसंग्रामात नांदेड जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या उठावांचे मराठी साहित्यातील चित्रण : एक चिकित्सक अभ्यास”

संशोधन आराखडा

“स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्यविद्या शाखे अंतर्गत, मराठी विषयातील पी.एच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा संक्षिप्त आराखडा”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

● संशोधक ●

श्री देवीदास भाऊराव फुलारी,

बी.एस्सी., एम.ए. (मराठी), एम. एड्.

● मार्गदर्शक ●

प्रा.डॉ. साहेबराव भानुदासराव शिंदे

एम.ए. (मराठी), सेट, नेट, एम. फील., पी.एच.डी.

मराठी विभाग प्रमुख, वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी, नांदेड.

● मार्च - 2023 ●

प्रस्तावना :

मराठवाडा मुक्तीसंग्रामातील अतिशय महत्त्वाची आणि अधोरेखित करावी अशी घटना म्हणजे पेठ उमरी येथील बँक ॲक्शन होय. उमरी (रे.स्टे.) हे नांदेड जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण आहे. ३० जानेवारी १९४८ रोजी आपल्या सशस्त्र स्वातंत्र्य सैनिकांनी उमरी येथील निजामाच्या स्टेट बँकेवर चढाई केली आणि पूर्ण बँक ताब्यात घेतली. जवळपास २२ लाखाची रक्कम ताब्यात घेतली अन् हा पैसा उमरखेड कॅम्प मार्गे स्वदेशात पाठवला. याच दिवशी दिल्ली येथे महात्मा गांधीजींचा खून झाला. तो इतिहास तसा खूप मोठा आहे. सांगण्याचा हेतू हा की या पेठ उमरी पासून तीन कि.मी. अंतरावर संशोधन कर्त्याचे गोरठा नावाचे गाव आहे. तो गोरठ्याचा रहिवासी असल्याने उमरी बँक ॲक्शनचा इतिहास सतत कानावर येत असे. स्वाभाविकपणे या घटनेबद्दल अन् एकूणच मराठवाडा मुक्ती संग्रामाबद्दल संशोधन कर्त्याच्या मनात आकर्षण निर्माण झाले. पुढे मुक्ती संग्रामाचा इतिहास वाचण्यात आला. मग स्वातंत्र्य सैनिकांची आत्मचरित्रे वाचण्यात आली. इतर वाङ्मय प्रकारामध्येही मुक्तीसंग्रामाचे चित्रण वाचण्यात आले. हा रोमहर्षक इतिहास वाचण्यात आला. त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांच्या उठावांचे मराठी साहित्यात आलेल्या चित्रणाचा सर्वार्थाने अभ्यास करावा ही प्रबळ इच्छा मनात निर्माण झाली. यातूनच या विषयाच्या संशोधनाकडे संशोधक विद्यार्थी वळला आहे.

पुढे मराठी साहित्यात वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारात संशोधन कर्त्याने लेखनही केले. कविता, कादंबरी, समीक्षा, संपादने, बाल-साहित्य इ. प्रकारात लेखन करत मराठवाडा साहित्य परिषदेच्या माध्यमातून साहित्यिक चळवळीत काम सुरू केले. त्यामुळे प्रकाशन सोहळे, चर्चासत्र, परिसंवाद, साहित्य संमेलनाच्या मंचावरून विचार मांडले. याच प्रवासात मराठवाडा मुक्तीसंग्रामावर व्याख्याने पण दिली. हा संग्राम अतिशय रोमांचकारी होता, पण त्या तुलनेने यावर विपूल प्रमाणात लेखन झालेले नाही. तसेच घरादारावर तुळशी पत्र ठेवून अनेक स्वातंत्र्य सैनिक हुतात्मे झाले, त्यांचा पुरेसा इतिहास उपलब्ध नाही. या सर्व गोष्टींचा विचार करून मराठी साहित्यात प्रकाशित झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या उठावांचा अभ्यास करण्याची इच्छा मनात निर्माण झाली आणि या भूमिकेतूनच संशोधक विद्यार्थ्याने या विषयाची निवड केलेली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

मराठवाडा हा भूभाग उर्वरित महाराष्ट्रापेक्षा सामाजिक-सांस्कृतिक दृष्टीने अतिशय वेगळा आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही हा भू-प्रदेश निजामाच्या अधिपत्याखाली होता. निजामी राजवटीच्या माध्यमातून रझाकारी संघटनेने मराठवाड्याच्या सामान्य आणि निरापराध जनतेचा अनन्वित छळ केला. यातून स्थानिक नागरिकात भय तर निर्माण झाले. शिवाय संघर्ष करण्याची भूमिका निर्माण झाली. यातून काही नेतृत्त्व पुढे आले. त्यांनी या जुलमी राजवटीत खूप मोठा संघर्ष केला. तो संघर्ष स्वातंत्र्य सैनिकांच्या व अन्य लेखकांच्या लेखनातून आविष्कृत झालेला आहे. त्या साहित्याच्या माध्यमातून मराठवाड्यातील सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीचा दस्ताऐवज प्रबंध विषयाच्या अनुषंगाने मांडता येईल. या विषयाच्या अनुषंगाने पुरेसे संशोधन झाल्याचे दिसत नाही. म्हणून या प्रस्तुत विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१) हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या संघर्षाची कारण मीमांसा शोधणे.

२) मराठवाड्यातील मराठी भाषेची तत्कालीन झालेली पडझड याचा शोध घेणे.

३) मराठवाड्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी व इतर लेखकांनी साहित्यात उभा केलेला सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक भोवतालाचा अभ्यास करणे.

४) स्वातंत्र्य सैनिकांच्या पारिवारिक स्थिती गतीचा अभ्यास करणे.

५) स्वातंत्र्य सैनिकांच्या व इतर लेखकाच्या साहित्यातून निजामी राजवटीचा जनसामान्यांच्या जीवनावर झालेल्या अन्याय-अत्याचाराचा वेध घेणे.

६) स्वातंत्र्य सैनिकांच्या आणि इतर संबंधित लेखकाच्या साहित्यात आढळणाऱ्या सांघिक भावनेचा अभ्यास करणे.

७) स्वातंत्र्य सैनिकांच्या लेखनातील राष्ट्रनिष्ठा, मातृभूमीविषयी प्रेम, त्यागाची भावना इ. विषयाची मांडणी करणे.

८) स्वातंत्र्य सैनिकांच्या लेखनातून त्यांनी उभारलेल्या विविध आंदोलनाचे स्वरूप व त्याच्या परिणितीचा अभ्यास करणे.

९) नांदेड जिल्ह्यात स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या विविध उठावांवर प्रकाश टाकणे.

१०) नांदेड जिल्ह्यातील उपेक्षित राहिलेल्या उठावांचा अभ्यास करून त्याचा सत्य इतिहास मांडणे.

गृहितकृत्ये :-

१) हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे मराठी साहित्यात उमटलेल्या चित्रणाच्या माध्यमातून तत्कालीन समाज जीवनाचे दर्शन घडते.

२) स्वातंत्र्य सैनिकांच्या व इतर संबंधित लेखकांच्या मुक्तीसंग्राम विषयक साहित्यातून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक चळवळीवर प्रकाश पडतो.

३) स्वातंत्र्य सैनिकांनी उभारलेल्या विविध उठावांच्या माध्यमातून मराठी भाषेवर झालेल्या परिणामांचा प्रभाव दिसून येतो.

४) हैद्राबाद मुक्ती संग्रामावरील प्रकाशित झालेल्या साहित्याच्या माध्यमातून निरपराध लोकांच्या जीवनावर अन्याय झाल्याचे प्रकर्षाने जाणवते.

५) स्वातंत्र्य सैनिकांनी भोगलेल्या आत्मक्लेषांची प्रचिती जाणवते.

६) स्वातंत्र्य सैनिकांच्या तनामनातील पराकोटीचे मातृभूमी प्रेम दिसून येते.

७) नांदेड जिल्ह्यात स्वातंत्र्य सैनिकांनी उभारलेल्या उठावातून त्यांच्याकडील संघटन शक्तीचे दर्शन होते.

८) स्वातंत्र्य सैनिकांनी उभारलेल्या यशस्वी लढ्यामागे सर्वसामान्य जनतेच्या योगदानाची कल्पना येते.

संशोधन पध्दती :-

संशोधन कार्यामध्ये संशोधन पध्दतीला अतिशय महत्त्व असते. एकूणच या संशोधन कार्याची व्याप्ती पाहता सदर संशोधकाने वर्णनात्मक आणि विवेचनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्याचे ठरविले आहे.

संशोधनाच्या ऐतिहासिक संशोधन पध्दती, वर्णनात्मक संशोधन पध्दती व प्रायोगिक संशोधन पध्दतीचा उपयोग केला जातो पण प्रस्तुत संशोधन हे स्वातंत्र्य सैनिकांच्या उठावावर आधारीत असल्याने ऐतिहासिक संशोधन पध्दती संयुक्तिक राहणार आहे. यामध्ये भूतकाळातील घटना प्रसंगांचा अभ्यास करता येईल. या संशोधन प्रक्रियेत तत्कालीन शैक्षणिक, सामाजिक घटनांचा अभ्यास करता येईल. या पध्दतीमुळे तत्कालीन वेगवेगळ्या घटनांचे चिकित्सक पध्दतीने विश्लेषण करता येणार आहे. तसेच स्वातंत्र्य सैनिकांचे व इतर लेखकांचे साहित्य अभ्यासून त्यातील घटनांचा अन्वय

लावणे. विविध स्वातंत्र्य लढ्यातून आलेला देशभक्तीचा रोमांचकारी इतिहास या संशोधन पध्दती द्वारे मांडता येणार आहे.

संशोधनाची साधने :-

प्रस्तुत संशोधन परिपूर्ण होण्यासाठी वेगवेगळ्या साधन सामुग्रीचा उपयोग करायचा आहे. मुक्तीसंग्रामाच्या संदर्भात लेखन झालेले विविध ग्रंथ, विविध शोध प्रबंध, नियतकालिके, विशेषांक, विविध दिवाळी अंक, शब्दकोश इ.चा संदर्भाप्रमाणे उपयोग केला जाणार आहे.

संशोधनाच्या विषयाची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनासाठी हैद्राबाद मुक्तीसंग्रामात नांदेड जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांनी जी वातारण निर्मिती केली, जे उठाव केले आणि या उठावाचे प्रतिबिंब मराठी साहित्यात प्रकाशित झाले याचा चिकित्सक अभ्यास करावयाचा संशोधकांनी ठरवले आहे. यात कथा, कादंबरी, लेखसंग्रह याशिवाय वेळोवेळी वेगवेगळ्या नियतकालिकामध्ये, अनियतकालिकामध्ये प्रकाशित झालेले नांदेड जिल्ह्यातील विविध उठावाचे चित्रण सामुग्री म्हणून गृहीत धरली आहे. या संशोधनात खालीलप्रमाणे प्रकरणे पाडली आहेत.

१) **प्रकरण पहिले :-** हैद्राबाद मुक्ती संग्रामाची भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी.

२) **प्रकरण दुसरे :-** नांदेड शहरातील सराफा झेंडाप्रकरणाचे मराठी साहित्यातील चित्रण.

३) **प्रकरण तिसरे :-** नांदेड तहसिलदाराची हत्या, इजळीच्या स्वातंत्र्य सैनिकांचे लेव्ही प्रकरण आणि ॲक्शन इस्लापूर यांचे मराठी साहित्यातील पडसाद.

४) **प्रकरण चवथे :-** ऑपरेशन उमरी बँक आणि मराठी साहित्य.

५) **प्रकरण पाचवे :-** कल्लाळी, कोळी आणि इतर रणसंग्रामाचे मराठी साहित्यात उमटलेले प्रतिबिंब.

६) **प्रकरण सहावे :-** निष्कर्ष / उपसंहार.

आधारभूत ग्रंथ सूची :-

संशोधनासाठी खालील निवडक ग्रंथाचा प्रामुख्याने विचार होणार आहे.

१) स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी - स्वामी रामानंद तीर्थ

२) हैद्राबाद राज्याचे विसर्जन - दिगंबरराव बिंदू

३) घडून गेलेली गोष्ट - पुरूषोत्तम चपळगावकार

४) पेटलेले दिवस, आला याच कारणासी, कावड - अनंत भालेराव

५) हैद्राबाच्या आठवणी - व्य.तू. कुलकर्णी

६) हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि मी - चंद्रशेखर वाजपेयी

७) हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील आठवणी - ज.रा.बर्दापूरकर

८) अजून उजाडायचे आहे, नवरात्र - श्रीधर कुलकर्णी

९) वाहून गेलेले पाणी - दिगंबर कुलकर्णी

१०) हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि आम्ही - ल.मा.चाकूरकर

११) प्रतर्दनाचे दिवस - सुधाकर डोईफोडे

१२) हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन - नरहर कुरूंदकर

१३) अनंत भालेराव काळ आणि कर्तृत्व - नरेंद्र चपळगावकर

सहाय्यक सूची :-

१) मराठवाड्यातील साहित्य - संपादन : प्रल्हाद जी. लुलेकर, सतीश बडवे, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद

२) विसाव्या शतकातील महाराष्ट्र - खंड सहावा, य.दि.फडके, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

३) विसाव्या शतकातील महाराष्ट्र - खंड सातवा, य.दि.फडके, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

४) विसाव्या शतकातील महाराष्ट्र - खंड आठवा, य.दि.फडके, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

५) दिवस : हैद्राबाद मुक्ती संग्रामातील, सं. डॉ. बालाजी कोंपलवार व डॉ. ललिता अलसटवार.

६) योध्दा कर्मयोगी गोविंदभाई श्रॉफ - डॉ.वि.ल. धारूरकर

७) मुक्तीगाथा - मुक्तीदाता - डॉ.पी.जी.जोशी.

८) संन्यस्त स्वातंत्र्य सेनानी - पू. स्वामी रामानंद तीर्थ - डॉ.तारा परांजपे.

९) श्री विठ्ठलराव रत्नाळीकर यांचा जीवन संग्राम - ॲड. श्रीनिवास रत्नाळीकर.

१०) परवड (कादंबरी) - सुधाकर डोईफोडे

११) हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी - स्वामी रामानंद तीर्थ

१२) समग्र अनंत भालेराव खंड १ व खंड २ - संपादक - निशिकांत भालेराव.